
शनिवार, १६ ऑक्टोबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ८९
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग
पनवेल परिसरात सायबर गुन्हेगारीत वाढ/३
खबरबात : जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी खुला/४
कृषी विभागाच्या बियाणांत भेसळ; शेतकऱ्यांचे नुकसान/५

## कोरोनाच्या नवीन व्हेरियंटचे जगभरात गंभीर परिणाम



**आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून चिंता व्यक्त**

**नवी दिल्ली :** कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा लहान मुलांवरील धोका लक्षात घेता कोरोना प्रतिबंधक लसीलाही मान्यता देण्यात आलेली आहे. यातच आता कोरोनाच्या नवीन व्हेरियंटच्या उदयामुळे अनिश्चितता वाढली आहे. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेच्या पुनर्प्राप्तीच्या गतीवर परिणाम होण्याची भीती आहे, असे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ)ने म्हटले आहे. कोरोनाला रोखण्यासाठी सार्वत्रिक लसीकरणाला गती देण्याची गरज आहे आणि अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि तत्काळ कार्यवाहीवरही भर दिला पाहिजे, असे आयएमएफच्या वार्षिक बैठकीचे अध्यक्षपद भूषवलेल्या स्वीडनच्या अर्थमंत्री मॅग्डालेना अँडरसन यांनी म्हटले आहे.

# कोरोना काळानंतर भारतीय अर्थव्यवस्थेला वेग -नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**कोरोनाच्या कठीण काळानंतर आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये वेगाने वाढ होत आहे. अर्थव्यवस्था पुन्हा रुळावर येत आहे. त्यामुळे संपूर्ण देशाला आता आशा आहे. नुकतेच एका जागतिक संस्थेनेसुद्धा म्हटले की, भारत पुन्हा एकदा जगातील वेगाने पुढे जाणारी अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.**





पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी (दि. १५) व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून गुजरातमधील एका कार्यक्रमात सहभागी झाले होते. सूरतमधील सौराष्ट्र पटेल सेवा समाजाकडून उभारण्यात येणाऱ्या हॉस्टेलचे भूमिपूजन त्यांनी केले. यानिमित्ताने भारतीय अर्थव्यवस्थेवर पंतप्रधान मोदी यांनी भाष्य केले.

ते म्हणाले की, स्टार्टअप इंडियाचे यश आपल्या सर्वांसमोर आहे. आज भारतातील स्टार्टअप संपूर्ण जगात नाव कमवत आहेत. कोरोनाच्या कठीण काळानंतर देशाच्या अर्थव्यवस्थेने एवढ्या वेगाने उभारी घेतली आहे की संपूर्ण जग आशेने भारताकडे बघत आहे. एका जागतिक संस्थेनेही असे म्हटले आहे की पुन्हा एकदा भारत जगातील सर्वांत वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था बनत आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा उल्लेख करताना मोदींनी म्हटले की, नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात व्यावसायिक अभ्यासक्रम हे प्रादेशिक भाषेत शिकण्याचा पर्याय आहे. आता शिक्षण म्हणजे फक्त डिग्री नाही, तर शिक्षणाला कौशल्याशी जोडले जात आहे. देश आपल्या परंपरागत कौशल्यांना आता आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडत आहे.

सबका साथ, सबका विकास हा नारा किती शक्तिशाली आहे हेसुद्धा मोदींनी या वेळी सांगितले. मोदी म्हणाले की, सबका साथ, सबका विकास आणि त्यात असलेली ताकद ही मी गुजरातमधूनच शिकलो. तुमच्या सर्वांच्या आशीर्वादामुळे कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना, जातीच्या राजकारणाचा पाठिंबा नसताना गुजरातच्या सेवेची संधी मिळाली. तुमच्या आशीर्वादाची ताकद इतकी मोठी आहे की, आज २० वर्षे झाली अखंडपणे आधी गुजरातची आणि आता देशाची सेवा करण्यास मिळाली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने गुजरातचे नवनियुक्त मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांचे जोरदार कौतुक मोदी यांनी केले. विविध तंत्रज्ञानाची माहिती असलेले भूपेंद्र हे आजही जमिनीवर आहेत. ते आजही कुठल्या वादात अडकले नाहीत. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली गुजरात आणखी विकास करेल, असा विश्वास मोदी यांनी या वेळी व्यक्त केला.

## सरसंघचालक मोहन भागवतांचा ड्रग्जसह ओटीटी प्लॅटफॉर्मवर हल्लाबोल

**नागपूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी देशातील ड्रग्जचे व्यसन आणि ओटीटी प्लॅटफॉर्मवरील चित्रपट, वेबसीरिजवरून हल्लाबोल केला. नागपूरमधील विजयादशमीच्या भाषणात भागवत यांनी देशातील वाढत्या ड्रग्जच्या व्यसनावर चिंता व्यक्त केली, तसेच राज्य सरकारला ड्रग्ज व्यसनांचे पूर्ण निर्मूलन करावे लागेल, असे मत व्यक्त केले.





या वेळी त्यांनी ओटीटी प्लॅटफॉर्मवरील निर्मितीवरही निशाणा साधला. त्यावर नियंत्रणाची मागणी केली. ते दसऱ्यानिमित्त नागपूरमध्ये बोलत होते. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह इस्राईलचे वाणिज्यदूत कोब्बी शोशानीदेखील उपस्थित आहेत.

मोहन भागवत म्हणाले, तंत्रज्ञानाच्या आधारावर नवनव्या गोष्टी येत आहेत. या गोष्टी आगीत तेल ओतण्याचे काम करत आहेत. ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर नियंत्रण नाही. तेथे कशाप्रकारचे चित्रपट येतात, काय काय येते? आता कोरोना काळात तर लहान मुलांच्या हातातसुद्धा मोबाइल आलाय. ऑनलाइन काय पाहायचे, काय नाही याचे काहीच नियंत्रण नाही. ओटीटी प्लॅटफॉर्मवर काय दाखवायचे यावरही नियंत्रण नाही.

देशात वेगवेगळ्या नशेचे पदार्थ येतात त्याचे व्यसन वाढत आहे. ते कसे रोखायला हवे हे माहिती नाही. उच्च वर्गापासून समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत भयंकर व्यसनाचे प्रमाण आहे. या नशेच्या पदार्थांच्या व्यापारातून आलेला पैसा कुणाच्या हातात जातो हे सर्वांना माहिती आहे. देशविरोधी कामात त्याचा उपयोग होतो. सीमेपलीकडील देश या नशेच्या पदार्थांच्या व्यापाराला प्रोत्साहन देतात. असे सर्व सुरू आहे, असे भागवत यांनी सांगितले.



या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा



**उलवे नोड : दसऱ्याच्या मुहूर्तावर सेक्टर ५ येथील भारती स्पेशालिटी हॉस्पिटलचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी आमदार महेश बालदी, भाजप उरण शहराध्यक्ष कौशिक शाह, नगरसेवक राजेश ठाकूर, अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष जसिम गॅस, उद्योजक राजेंद्र पडते, हॉस्पिटलचे संस्थापक बाबुराम वर्मा, डॉ. राहुल वर्मा, डॉ. संतोष वर्मा, जासई सरपंच संतोष घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, सदस्य चेतन घरत, डॉ. कृतिका अग्रवाल, डॉ. मोनिका सोनावणे आदी उपस्थित होते.**

## जितेंद्र आव्हाडांना मंत्रिपदावरून निलंबित करा -सोमय्या

**ठाणे : प्रतिनिधी**

अनंत करमुसे प्रकरणात तीन पोलिसांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली, मात्र राज्याचे गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाडांवर अद्यापही कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. त्यामुळे राज्यपालांकडे आव्हाड यांच्यावरदेखील निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येणार असल्याची माहिती भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी दिली.

गुरुवारी घडलेल्या जितेंद्र आव्हाड यांच्या अटक आणि जामीन प्रकरणानंतर शुक्रवारी (दि. १५) भाजप नेते किरीट सोमय्या यांनी अनंत करमुसे यांची भेट घेतली. अनंत करमुसे यांना एका ट्वीटवरून आव्हाड यांच्या समक्ष त्यांच्याच सुरक्षा रक्षकांनी बेदम मारहाण केल्यामुळे आव्हाड यांना अटक होऊन त्वरित जामीन झाला होता, याची किरीट सोमय्या यांनी कडक शब्दात निंदा केली. सचिन वाजे, मनसूख हिरेन अपहरण आणि हत्या, १०० कोटी वसुली प्रकरण अशी एकापाठोपाठ एक प्रकरणे ठाकरे सरकारच्या काळात उघड झाली असल्याची टीकाही त्यांनी या वेळी केली.

करमुसे यांच्या प्रकरणात तीन कॉन्स्टेबल निलंबित झाले, परंतु आव्हाड हे मंत्री असल्याने त्यांना पाठीशी घालण्यात येत आहे. या संदर्भात आव्हाड यांच्यावर कारवाई व्हावी यासाठी राज्यपालांची भेट घेणार असल्याचे त्यांनी शेवटी स्पष्ट केले.

## निवडक

### अफगाणिस्तानात पुन्हा बॉम्बस्फोट; ३२ ठार

**कंदाहार :** अफगाणिस्तानवर तालिबानने ताबा मिळवल्यानंतर हिंसाचारात वाढ झाली असून शुक्रवारी अफगाणिस्तान पुन्हा एकदा बॉम्बस्फोटांनी हादरले. कंदाहार प्रांतातील एका मशिदीत मोठा बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आला. यामध्ये ३२ जण ठार झाले, तर या स्फोटातील जखमींची संख्या ४०हून अधिक आहे.

### काश्मीरमध्ये चकमकीत दोन जवान शहीद

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात गुरुवारी रात्री दहशतवादविरोधी कारवाईदरम्यान लष्कराचा एक अधिकारी आणि एक जवान शहीद झाले. पुंछ-राजौरी जंगलात लष्कर आणि दहशतवाद्यांमध्ये लढाई सुरू होती. ११ ऑक्टोबरपासून दहशतवाद्यांविरोधात सुरू करण्यात आलेल्या मोहिमेत आतापर्यंत एकूण सात जवान शहीद झाले आहेत.

### ‘जेईई अ‍ॅडव्हान्स’चा निकाल जाहीर

**नवी दिल्ली :** जेईई अ‍ॅडव्हान्स परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. या परीक्षेत आयआयटी दिल्ली झोनचा मृदुल अग्रवाल अव्वल आला आहे. मुलींमध्ये आयआयटी दिल्लीचीच काव्या चोप्रा प्रथम आली आहे.

## रोह्यात आज विकासकामांचे उद्घाटन आणि भूमिपूजन



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील रोठ ब्रुदुक येथे नव्याने बांधण्यात आलेल्या ग्रामसचिवालयाचे उद्घाटन व जलशुद्धीकरण आरओ प्लांटचे भूमिपूजन शनिवारी (दि. १६) सकाळी ९ वाजता करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रायगडचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र प्रदेश भाजपचे सरचिटणीस आमदार रवींद्र चव्हाण, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभणार आहे. अलिबाग-मुरूड मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी, महाडचे आमदार भरत गोगावले, पेण मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील यांच्यासह भाजप व शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

## ‘मविआ’चा अहंकार राज्यातील जनताच मोडेल -केशव उपाध्ये

**मुंबई :** महाविकास आघाडीच्या दहा तोंडी रावणाचा अहंकारही महाराष्ट्रातील जनताच मोडेल, अशी टीका भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी केली आहे, तसेच सामनाच्या अग्रलेखामधून केलेल्या टीकेलाही उपाध्ये यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.

उपाध्ये यांनी ट्विटमध्ये म्हटले की, महाविकास आघाडीत सामील झाल्याने हिंदुत्वाचा बुरखा फाटला. काँग्रेस-राष्ट्रवादीच्या मांडीला मांडी लावून तुम्ही माननीय बाळासाहेबांची शिवसेना आता राहिली नाही हे वारंवार दाखवून दिले. महाराष्ट्र बंदमध्ये सहभागी होत नाही म्हणून रिक्षाचालकांना मारहाण केली, महाविकास आघाडीच्या दहा तोंडी रावणाचा अहंकारही महाराष्ट्रातील जनताच मोडेल.

## आता लोकल प्रवाशांना अधिक दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**



कोविड प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेतलेल्यांना रेल्वे प्रवासासाठी आता मासिक पासबरोबरच तिकीटही मिळणार आहेत, तसेच १८ वर्षांखालील सर्वांना कोणत्याही अटीविना प्रवास करता येणार आहे. रेल्वेच्या या निर्णयामुळे लाखो प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

लोकल सेवा शालेय विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील शाळा आता पुन्हा एकदा सुरू झाल्या आहेत. २० ऑक्टोबरपासून राज्यातील महाविद्यालयेदेखील सुरू होणार आहेत. त्यामुळे १८ वर्षांखालील मुलांना लोकल प्रवासाची परवानगी देण्यात आली आहे. याशिवाय प्रकृती अस्वास्थ्यामुळे ज्यांना कोरोनाविरोधी लस घेण्याची परवानगी नाही अशा व्यक्तींना डॉक्टरच्या मेडिकल सर्टिफिकेट तिकीट खिडकीवर सादर करून तिकीट घेता येईल. तिकीट केवळ तिकीट खिडकीवरूनच उपलब्ध केले जाणार आहे. अन्य कोणत्याही प्रकारे तिकीट उपलब्ध होणार नाही.

## गाता रहे मेरा दिल... किशोर कुमार यांना संगीतमय आदरांजली

### आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर, तसेच रोटरी क्लब ऑफ उलवे नोड यांच्या संयुक्त विद्यमाने आणि कलासागर परिवारनिर्मित आयोजित स्वर्गीय किशोर कुमार यांना श्रद्धांजली अर्पित करण्याच्या ‘गाता रहे मेरा दिल’ या कार्यक्रमात बहारदार किशोर गीतांचा अनुभव श्रोत्यांना अवर्णनीय आनंद देऊन गेला. या कार्यक्रमात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती.




या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

**‘मनोरंजनासोबतच रोजगाराच्या संधी’**

*कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, रोटरी कलबने स्वर्गीय किशोर कुमार यांना संगीतमय श्रद्धांजली देण्यासाठी बहारदार कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. मी आयोजक रवी नाईक यांना विनंती करतो की, असे कार्यक्रम आपण ठिकठिकाणी जनतेसाठी करावेत जेणेकरून मनोरंजनासोबतच कलाकार, वादक जे त्यांच्या रोजगारापासून वंचित होते त्यांना एक हक्काचे रोजगार साधन प्राप्त होईल.*

आयोजक रवी नाईक आणि श्रीकांत मुंबईकर यांनी गायक, अभिनेते, निर्माते, संगीत दिग्दर्शक स्वर्गीय किशोर कुमार यांच्या स्मृतिदिनी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. माजी नगरसेविका वर्षा नाईक, रवी नाईक यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाला मूर्त रूप देण्यात आले. पनवेलच्या मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात हा बहारदार कार्यक्रम झाला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपण सारे यापूर्वी कोरोना कालखंडातून गेलो आहोत. आपल्यातून अनेक जवळच्या लोकांनी न सांगता जगाचा निरोप घेतला आहे. या संघर्षमय कालखंडात टिकून राहत असताना आपण साऱ्यांनीच छंद, व्यासंग यांचा अवलंब केला. संगीत या छंद प्रकाराचा आपल्याला एक हक्काचा (पान २ वर)



पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
शनिवार, दि. १६ ऑक्टोबर २०२१ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
१०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
११. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
१२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल | १५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली | १६. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोवॅक्सिन

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल
३. लिटिल वर्ल्ड मॉल, खारघर

टीप : शनिवार, दि. १६ ऑक्टोबर २०२१ रोजी ग्रामीण लसीकरण होणार नाही.


# सात नव्या संरक्षण उत्पादन कंपन्या पंतप्रधान मोदींकडून राष्ट्राला समर्पित

## दसऱ्याच्या मुहूर्तावर व्यापक सुधारणांना प्रारंभ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दसऱ्याच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सात नव्या संरक्षण उत्पादन कंपन्या राष्ट्राला समर्पित केल्या आहेत. 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेचा हेतू पूर्ण करणाऱ्या या सात कंपन्यांपैकी एक कंपनी नागपूरमध्ये आहे. नागपूरमध्ये स्थित असणारी 'यंत्र इंडिया लिमिटेड' उद्घाटनाच्या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरीही उपस्थित होते.

उद्घाटनाच्या वेळी बोलताना पंतप्रधान म्हणाले की, ४१ आयुध निर्माण कारखान्यांना नवे रूप देण्याचा निर्णय आणि सात नव्या कंपन्यांची सुरुवात, देशाच्या याच संकल्पयात्रेचा भाग आहे. हा निर्णय गेली १५-२० वर्षे प्रलंबित होता. मला पूर्ण विश्वास आहे की या सर्व सात कंपन्या आगामी काळात भारतीय सैन्याची मोठी ताकद ठरतील. पुढे बोलताना ते म्हणाले की, जागतिक महायुद्धाच्या वेळी भारताच्या आयुध कारखान्यांची ताकद जगाने पाहिली आहे. आपल्याकडे उत्तम संसाधने होती, जागतिक दर्जाचे कौशल्य होते. स्वातंत्र्यानंतर





या कारखान्यांना अद्ययावत करण्याची, नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्याची आवश्यकता होती, मात्र याकडे लक्ष दिले नाही.

आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत संपूर्ण देशाचे लक्ष्य जगातील सर्वांत मोठी सैन्य ताकद बनवण्याचे आहे, भारतात आधुनिक सैन्य विकासाचे आहे. गेल्या सात वर्षांत देशाने 'मेक इन इंडिया'च्या मंत्रासह हा संकल्प पुढे नेण्याचे काम केले आहे. आज देशाच्या संरक्षण क्षेत्रात जेवढी पारदर्शकता, विश्वास आणि तंत्रज्ञानाचा वापर आहे, तो पूर्वी कधी नव्हता. स्वातंत्र्यानंतर प्रथमच संरक्षण क्षेत्रात व्यापक सुधारणा होत आहेत. एकल खिडकी प्रणालीची व्यवस्था केली आहे, असेही पंतप्रधान म्हणाले.

पंतप्रधान म्हणाले की, काही वेळापूर्वीच संरक्षण मंत्रालयाने अशा १०० पेक्षा अधिक सामरिक उपकरणांची यादी जाहीर केली, ज्यांची आता आयात करावी लागणार नाही. नव्या कंपन्यांसाठी देशाने आतापासूनच ६५ हजार कोटी रुपयांची ऑर्डर दिली आहे. यातून संरक्षण उद्योगांवर असलेला देशाचा विश्वास दिसून येतो. मी देशातील स्टार्टअप्सना सांगतो की, या सात कंपन्यांच्या माध्यमातून देशाने नवी सुरुवात केली आहे, तुम्हीसुद्धा यात सहभाग घ्या; तुमचे संशोधन, तुमचे उत्पादन कशाप्रकारे या कंपन्यांसमवेत एकमेकांना लाभदायक ठरेल यावर विचार केला पाहिजे.



**उलवे नोड : दसऱ्यानिमित्त योगेश गलगले यांनी गायत्री प्रॉपर्टीजचे नवीन कार्यालय सुरू केले आहे. या कार्यालयाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी उद्घाटन झाले. या वेळी वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, माजी स्थायी समिती सभापती तथा नगरसेवक शिवराम पाटील, आनंदराव कचरे, कृष्ण पाटील आदी उपस्थित होते.**



**पनवेल : दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर भास्कर पाटील आणि मेघश्याम पाटील यांनी आय व्हिला ऑप्टीक्स सुरू केले. भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते या ऑप्टीक्सचे शुक्रवारी उद्घाटन झाले. या वेळी भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, के. सी. पाटील, पंचायत समिती सदस्य भुपेंद्र पाटील, ग्रामपंचायत सदस्य महेंद्र गोजे आदी उपस्थित होते.**

# कामोठ्यातील मायाक्का देवीच्या हार जागराला आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राजमाता अहिल्यादेवी सेवा संस्था कामोठे यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आलेल्या मायाक्का देवीच्या हार जागरला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या वेळी आयोजकांतर्फे त्यांचा धनगर समजाचे प्रतीक घोंगडी, काठी, फेटा व फोटो प्रतिमा देऊन धनगरी पोशाख देऊन सत्कार करण्यात आला.

दरवर्षी कामोठे येथे 'मायाक्का देवीचा हार जागर' साजरा केला जातो. यंदाही मोठ्या उत्साहात हा जागर झाला. या वेळीही आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी भाजपचे कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, महिला व बाल कल्याण सभापती मोनिका महानवर, नगरसेवक दिलीप पाटील, विकास घरत, विजय चिपळेकर, तेजेस कांडपिळे, गोपीनाथ भगत, युवा नेते हॅप्पी सिंग, भटके विमुक्त महिला



आघाडीच्या जिल्हाध्यक्षा विद्या तामखडे, राजमाता अहिल्यादेवी सेवा संस्थेचे अध्यक्ष गणेश बेरगळ, उपाध्यक्ष पांडुरंग यमगर, सचिव रावसाहेब बुधे, कामोठे व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नानासाहेब मगदूम, खजिनदार अशोक माने, सहखजिनदार एन. डी. बुधे, माणिक सरगर, अर्जुन गावडे, कैलास सरगर, किसन यमगर, संघटक एकनाथ हुबाले आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कामोठेतील मायाक्का देवी मंदिर धनगरांचे आराध्य देवस्थान आहे. या मंदिराची ख्याती सर्वदूर पसरली आहे. पनवेल, नवी मुंबई व मुंबईतील भाविक देवीच्या दर्शनासाठी येथे येत असतात. कर्नाटक येथे रायबाग तालुक्यातील चिंचणी या गावी मायाक्का देवीचे मूळ मंदिर आहे. कामोठे वसाहतीमध्ये सांगली, सोलापूर व सातारा जिल्ह्यातील धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने आहेत.

या समाजातील मंडळींनी एकत्र येऊन २००९मध्ये राजमाता अहिल्यादेवी सेवा संस्थेची स्थापना केली आहे. या कालावधीत संस्थेने सेक्टर ३५ मध्ये मायाक्का देवीचे मंदिर बांधले. मंदिरातील मूर्ती पंढरपूर येथून आणली आहे. देवीच्या मूर्तीचे दर्शन घेतल्यावर भाविकांना चिंचणीला जाण्याची अनुभूती येते, असे म्हटले जाते. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त मंदिरात पालखी सोहळ्याचे आयोजन केले जाते. या ठिकाणी सांगली व सोलापूर जिल्ह्यातील नामवंत गजी ढोल नृत्य मंडळ कलाविष्कार सादर करतात. धनगरी ओव्या व धनगरी कैफियतच्या माध्यमातून संस्कृतीचे जतन केले जाते.


## आई एकविरा असेसरीज शॉपचे महेश बालदी यांच्या हस्ते उद्घाटन

**उरण : वार्ताहर**

उरण मध्ये प्रथमच कार आणि बुलेटचे मॉडिफिकेशन असेसरीज शॉप दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर बोकडवीरा, उरण पनवेल रोड येथे सुरू झाले असून त्याचे उद्घाटन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते झाले. त्यामुळे सर्व प्रकारच्या कारचे लेटेस्ट मॉडिफिकेशन असेसरीज खारघर व वाशीच्या दरात आई एकविरा असेसरीज हब बोकडवीरा, उरण येथे उपलब्ध होणार आहेत. याचा उरणच्या नागरिकांना निश्चित फायदा होणार आहे.



यापूर्वी मॉडिफिकेशनसाठी उरणमधील नागरिकांना खारघर, वाशीला जावे लागत होते. आता मात्र उरणमध्येच नागरिकांना ही सुविधा प्राप्त होणार असल्याने उरणमधील नागरिकांची पैसे व श्रमाची बचत होणार आहे, असे आमदार महेश बालदी उद्घाटनाच्या वेळी म्हणाले. या वेळी आई एकविरा असेसरीज हबचे गिरीश म्हात्रे, महेश जोशी यांना आमदार महेश बालदी यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. बोकडवीरा ग्रामपंचायतच्या सरपंच मानसी पाटील, सामाजिक कार्यकर्ते देवेंद्र पाटील, ग्रामसुधारणा मंडळ बोकडवीरा सेक्रेटरी भगवान पाटील, उरण तालुका भाजप युवा मोर्चा अध्यक्ष शेखर पाटील, गणपती देवस्थान ट्रस्ट बोकडविराचे विश्वस्त मनोज पाटील, ग्रामसुधारणा मंडळ अध्यक्ष सूर्यकांत पाटील, उरण तालुका भाजप चिटणीस सुनील पाटील, श्री गणेश मित्र मंडळ, फ्रेंड्स फोर एव्हर ग्रुप, फ्रेंडली बॉईज ग्रुपचे पदाधिकारी सदस्य, बोकडवीरा गावचे ग्रामस्थ आदी या वेळी उपस्थित होते.







**पनवेल : तालुक्यातील गव्हाण आणि कोपर या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या नवरात्रोत्सवांना महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गुरुवारी भेट देत देवींचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे तालुका चिटणीस जयवंत देशमुख, विनायक कोळी आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.**

पान १ वरून

## किशोर कुमार यांना संगीतमय आदरांजली

सहारा होता, असे सांगताना कार्यक्रमाच्या आयोजकांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वर्गीय किशोर कुमार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहात सर्व गायकांचे कौतुक केले. रवी नाईक, नरेश बुल्लू, गोपाळ पाटील, किशोर गवादे, जीतू पाटील, श्री. गिरी, पी. सी. म्हात्रे, कृष्णा नाईक, समाधान पाटील, राज नाईक, सिनियर आरटीओ निरीक्षक निलेश बनसोडे यांनी बहारदार आवाजात स्वर्गीय किशोर कुमार यांची गीते सादर केली, तर दया बाबरे, सोनल नाईक, सरिताजी यांनी युगल गीतांना साथ दिली. डॉ. गवादे यांनी स्त्री व पुरुष अशा दुहेरी आवाजात गाणे गात धमाल उडवून दिली.

संजय साउंड सर्व्हिसेस यांनी उत्तमप्रकारे ध्वनी नियोजन केले. राजन म्हात्रे यांच्या प्रकाश योजनेने कार्यक्रमात रंगत भरली. हा कार्यक्रम फेसबुक, तसेच अन्य समाज माध्यमांवर थेट प्रदर्शित करण्यात आला होता. हजारो दर्शकांनी कार्यक्रमाचा सोशल मीडियावर आनंद लुटला. अजित काकडे यांनी थेट प्रक्षेपण दाखवत प्रेक्षकांना अप्रतिम कार्यक्रमाचा आनंद दिला. रितेश तिवारी यांच्या खुमासदार शैलीतील निवेदनाने कार्यक्रमात रंगत आणली. सहनिर्माते पुरषोत्तम म्हात्रे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला नगरसेवक तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका नीता माळी, भाजप उत्तर रायगड जिल्हा संघटक सरचिटणीस अविनाश कोळी, रोटरी क्लबचे असिस्टंट गव्हर्नर सुनील कुरूप, रोटरी क्लब ऑफ रसायनीचे प्रेसिडेंट गणेश काळे, रोटरी क्लब ऑफ खोपोलीचे प्रेसिडेंट सुरेश खेडकर, रेश्मा कुरूप, अलका कोळी, पुरण सिंग मेहरा, सुवर्णा पाटील, सिटी बेलचे समूह संपादक मंदार दोंदे, विवेक पाटील आदी उपस्थित होते.

## दुर्गादेवी दर्शन





















**पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शेलघर, गव्हाण, वहाळ, बामणडोंगरी आणि उलवे या परिसरांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या नवरात्रोत्सवांना भेट देत दुर्गादेवीचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, अजय भगत, भाजपचे गव्हाण विभाग सरचिटणीस निलेश खारकर, नंदू ठाकूर, प्रवीण ठाकूर, शैलेश भगत, चेतन घरत, श्रीधर भगत, भाजप महिला मोर्चा उलवे अध्यक्षा योगिता भगत आदी उपस्थित होते.**

## निवडक

### घरफोडीत ४५ हजारांची रक्कम चोरी

**पनवेल :** अज्ञात चोरट्यांनी केलेल्या घरफोडीत ४५ हजार रुपयांची रोख रक्कम चोरी केल्याची घटना तालुक्यातील शिरढोण गाव येथील ग्रीन मेडोज सोसायटीमध्ये घडली आहे. या ठिकाणी राहणाऱ्या शुभांगी कसबे यांचे घर बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्यांनी कोणत्या तरी कठोर वस्तूने त्यांच्या दरवाजाचे कुलूप तोडून त्यावाटे घरामध्ये प्रवेश केला. चोरट्याने घरामधील लाकडी कपाटामध्ये ठेवलेली ४५ हजार रुपयांची रोख रक्कम चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### धमकी देऊन पैशांची मागणी

**पनवेल :** अश्लील फोटो व व्हिडीओ क्लिप सोशल मीडीयावर, तसेच नातेवाईकांकडे पाठवून बदनामी करेन, त्याबदल्यात मला १० लाख रुपये दे अशी धमकी देणाऱ्या एका व्यक्तीविरुद्ध पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील कोप्रोली गावात राहणाऱ्या एका ३० वर्षीय महिलेला एका ओळखीच्या व्यक्तीने तिचा विश्वास संपादन करून तिच्या राहत्या घरी तिच्या नकळत तिचे अश्लील फोटो व व्हिडीओ तयार केले. त्यानंतर हे व्हिडीओ नातेवाईक, समाजात, तसेच सोशल मीडियावर टाकण्याची धमकी देऊन १० लाख रुपयांची मागणी केली. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### मृताच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल :** साईकृपा हॉटेलच्या विरुद्ध दिशेला दि व्हेरी कोस्टल मिशन चर्च पीसी ग्राउंडच्या भिंतीजवळ पनवेल ते पेणकडे जाणाऱ्या डांबरी रस्त्याच्या बाजूला एक व्यक्ती पडलेला असल्याबाबत माहिती शहर पोलिसांना मिळाली. या व्यक्तीस उपचाराकरिता उपजिल्हा रुग्णालयात नेले असता तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले आहे. या वेळी शहर पोलीस ठाण्यात सीआरपीसी १७४ नुसार आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या मयत व्यक्तीचे वय ४० ते ५० वर्षे, उंची अंदाजे ५.५ फूट, रंग काळा, डोक्याचे केस काळे, दाढी पांढरी वाढलेली आहे. अशा वर्णनाच्या व्यक्तीबाबत माहिती असल्यास शहर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार आर. एन. पगारे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### उरण महाविद्यालयात लसीकरण

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व उरण येथील इंदिरा गांधी हॉस्पीटलच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात सोमवारी (दि. ११) कोरोना लसीकरण शिबिर घेण्यात आले. या लसीकरण शिबिरात आरोग्य सहाय्यक संतोष पगारे, आरोग्य सेविका प्राची पाटील, विलासिनी पोरवेकर, अधिपरिचारिका निवेदिता कोटकर यांनी विद्यार्थ्यांचे लसीकरण केले. या वेळी महाविद्यालयातील एकूण ३२ विद्यार्थ्यांनी लस घेतली. महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए. शामा, ज्येष्ठ प्रा. व्ही. एस. इंदूलकर, आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. डॉ. ए. आर. चव्हाण व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. डी. पी. हिंगमिरे आदी उपस्थित होते.

### शुभांगी लाड यांना नवदुर्गा पुरस्कार

**पनवेल :** क्षितिज पर्व स्नेहकुंज आधारगृह संगीत एकता सांस्कृतिक कला व सामाजिक संस्था जनाधर्मा आधारगृह व द्वारकादास श्यामकुमार यांच्या संयुक्त विद्यमाने सन्मान नवदुर्गा पुरस्कार २०२१ने ॲड. शुभांगी केदार लाड यांना प्रशस्तीपत्र व पैठणी साडी देऊन सन्मानित करण्यात आले. स्नेहकुंज आधारगृहाच्या संचालिका संगीता नितीन जोशी, जनाधर्मा आधारगृह सहसचिव दीपाली पारसकर, क्षितीज पर्वचे संपादक सनीप कलोते यांनी ॲड. शुभांगी केदार लाड यांनी आतापर्यंत माता भगिनींना न्याय देण्याच्या माध्यमातून केलेले कार्य लक्षात घेऊन त्यांचा विशेष सन्मान केला.



### कारखान्यात विजेची चोरी; गुन्हा दाखल

**पनवेल :** किरवली गाव येथे प्लास्टिक दाना बनवण्याच्या कारखान्यात १३ लाखांची वीज चोरी पकडण्यात आली आहे. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किरवली टोल प्लाझाजवळ पनवेल मुंब्रा रोड येथे प्लास्टिक दाणा बनवण्याच्या कारखान्यात वीज चोरी होत असल्याची माहिती महावितरणला मिळाली होती. त्यानुसार महावितरणच्या अधिकाऱ्यांनी या ठिकाणी पाहणी केली. अनधिकृतपणे मीटरमध्ये फेरफार करून वीज वापरून महावितरणचे सहा महिन्यांपासून ६५ हजार ७०३ युनिटचे नुकसान केले, तसेच १२ लाख ९६ हजार ७० रुपयांची वीज चोरी करून महावितरणचे आर्थिक नुकसान केले.

### हेमलता चिंबुलकर यांना डॉक्टरेट

**मोहोपाडा :** प्रभाकर चिंबुळकर यांनी साऊथ वेस्टर्न



अमेरिकन युनिव्हर्सिटीमधून डॉक्टर ऑफ हिस्टरी यावर डॉक्टरेट पीएचडी केल्याबद्दल त्यांना पॉडिचेरी येथे सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. हेमलता चिंबुळकर यांनी भगवान गौतम बुद्धाच्या इतिहास जीवनावर अभ्यास केला आहे. यात सर्वोत्कृष्ट गुण मिळवून त्यांनी डॉक्टरेट पीएचडी मिळविली आहे. दरम्यान, या वेळी ग्लोबल अचिव्हर्स कौन्सिलचे चेअरमन डॉ. आर. सेलवान, न्यायाधीश के. स्वयंदुरई, न्यायाधीश के. व्यंकटेशन, यूएसए युनिव्हर्सिटीचे जोनम पेंटर, आयुर्वेदिक औषधतज्ज्ञ डॉ. सतीश मनोहर आदी उपस्थित होते. हेमलता चिंबुळकर यांना डॉक्टरेट पीएचडी मिळाल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पनवेल परिसरात सायबर गुन्हेगारीत वाढ




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसरामध्ये सायबर गुन्हेगारीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून पनवेल परिसरातील पोलीस ठाण्यात अनेक सायबर गुन्ह्यांची नोंद झाली असून या गुन्ह्यांची उकल करणे पोलिसांना आव्हान आहे. शहर आणि ग्रामीण भागातली इंटरनेट, ई-मेल, विविध ॲप वापरकर्त्यांमधील दरी कमी होत आहे. वाढत्या वापराबरोबरच सायबर गुन्हेगारीही वाढल्याचे निदर्शनास येत आहे.

क्रेडिट कार्डवर जमा झालेल्या रिवर्ड पॉइंटचा वापर करण्याच्या बहाण्याने एका सायबरचोराने पनवेलमध्ये राहणाऱ्या व्यक्तीला ॲपवर क्रेडिट कार्डची सर्व माहिती भरण्यास सांगून त्याद्वारे त्यांच्या खात्यातून पावणेदोन लाख रुपये उकळल्याची घटना उघडकीस आली. पनवेल शहर पोलिसांनी या सायबर चोराविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेले गौतम सुबोध घटक (६०) हे पनवेलच्या तक्का भागात कुटुंबासह राहण्यास असून ८ सप्टेंबर रोजी दुपारी त्यांना एका अज्ञात सायबर चोराने ॲक्सिस बँकेच्या क्रेडिट कार्ड विभागातून बोलत असल्याचे सांगून संपर्क साधला होता, तसेच त्याने गौतम यांच्या क्रेडिट कार्डवर रिवर्ड पॉइंट जमा झाल्याचे सांगितले. गौतम यांनी त्याबाबत अधिक चौकशी केल्यानंतर सायबर चोराने त्यांना क्रेडिट कार्डची माहिती एका ॲपवर भरण्यास सांगितली. त्यानुसार गौतम यांनी सर्व माहिती भरल्यानंतर काही वेळातच क्रेडिट कार्डवरून तीन व्यवहार झाल्याचे व त्यातून सुमारे पावणेदोन लाख रुपये दुसऱ्या खात्यात वळते झाल्याचे मेसेज गौतम यांच्या मोबाइलवर आले. त्यानंतर आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात आल्यानंतर गौतम यांनी कस्टमर केअरला संपर्क साधून क्रेडिट कार्ड ब्लॉक केले. त्यानंतर त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## केवायसी अपडेटच्या बहाण्याने फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

गेल्या काही दिवसांपासून केवायसी अपडेटच्या नावाखाली फसवणूक होण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अशीच घटना घडली आहे.

सायबर ठगाने केवायसी अपडेटच्या नावाखाली ऑनलाइन टीम व्हिवर क्विक सपोर्ट आणि ॲनीडेस्क रिमोट डेस्कटॉप सॉफ्टवेअर अशी दोन ॲप मोबाईलमध्ये डाउनलोड करण्यास सांगितले. त्या माध्यमातून ३,३१,७४३ रुपयांच्या रकमेची फसवणूक करीत बँक खात्यावर डल्ला मारला आहे. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फसवणुकीसाठी सायबर चोरटे नवनवीन क्लृप्त्या लढवत असतात. सध्या मोबाइल केवायसी अपडेटच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असल्याचे समोर येत आहे.




अशीच घटना खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये घडली आहे. पनवेल तालुक्यातील चिपळे गाव येथे राहणाऱ्या एका ६५ वर्षीय नेव्हीमधून सेवानिवृत्त झालेल्या व्यक्तीची फसवणूक झालेली आहे. भामट्याने त्या व्यक्तीची एकूण ३,३१,७४३ रुपयांची फसवणूक केली. तक्रारदाराने फोन केला असता त्या भामट्याने आपले नाव राहुल शर्मा असल्याचे सांगितले व फोन कट केला आणि पुन्हा फोन लागलाच नाही. या वेळी तक्रारदाराला आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे गाठत फसवणुकीबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## कर्ज मिळवून देतो सांगून फसविले; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

उद्योग कर्ज मंजूर करण्याचे आमिष दाखवून कर्ज न देता ९८ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार नवीन पनवेल येथे उघडकीस आला आहे. अज्ञात आरोपीविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



नवीन पनवेल, सेक्टर १९ येथील प्रेरणा वसंत रणखांबे यांचा हॉटेल व्यवसायिकांना बॅग, कंटेनर पुरवठा करण्याचा व्यवसाय आहे. या वेळी सौरभ भोनकर यांनी त्यांना फायनान्स कंपनीतून कर्ज मिळवून देतो, असे सांगितले. स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेतून ६० लाख रुपयांचे कर्ज मंजूर करून देतो असे सांगून त्यांच्याकडून १० हजार रुपये घेतले. त्यानंतर सौरव याने कर्ज मंजूर करण्याचे काम हा त्याचा मित्र प्रेमशील साळवी करून देईल असे सांगितले. त्यानंतर प्रेमशील साळवी याने कर्ज मंजूर करण्याकरता ८८ हजार रुपये रणखांबे यांच्याकडून घेतले, मात्र कर्ज मंजूर केले नाही. कर्ज मिळवून देण्याच्या बहाण्याने रणखांबे यांच्याकडून दोघांनी ९८ हजार रुपये घेऊन त्यांना कर्ज दिले नाही व त्यांची फसवणूक केली. या प्रकरणी सौरभ भोनकर व प्रेमशील साळवी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## कळंबोली येथे नवरात्रोत्सव उत्साहात साजरा

### आमदार प्रशांत ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दिली भेट

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली येथील अजिंक्य तारा मित्र मंडळ व श्री मंगलेश्वरी माता मंदिर ट्रस्टच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवाला गुरुवारी (दि. १४) आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, नगरसेवक विक्रांत पाटील यांनी भेट दिली.



या वेळी त्यांचे आयोजकांच्या वतीने स्वागत करण्यात आले.

कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, ट्रान्स्पोर्ट सेलचे कोकण प्रदेश अध्यक्ष, मंडळाचे अध्यक्ष सिद्धू शर्मा, कळंबोलीतील नगरसेवक, नगरसेविका, रमेश राव, मलिक, रमेश गोदीया, देवीलाल चौधरी, राजकुमार, शर्मा प्रिंटर, राजेश चौधरी, विजेंदर, अंकुश, रमेश डीएमआर, संजय डागर, रिंकू शर्मा, सुशील शर्मा, अशोक शर्मा, जोशी, दिनेश शर्मा, रामदास कोरडे, अजित, प्रदीप बेलवाल, हिमांशू पाठक, रणदीप कनवार, राकेश शर्मा, संतोष सारस्वत, रमेश सिंग, बादल राठोड, वासुदेव शर्मा पदाधिकारी या वेळी उपस्थित होते. दरम्यान, या वेळी कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण शिबिरही आयोजित करण्यात आले होते, अशी माहिती कळंबोली कार्यालयीन चिटणीस जगदीश खंडेलवाल यांनी दिली.








**पनवेल : दिघाटीचे सरपंच अमित पाटील यांच्या स्वखर्चातून करण्यात आलेल्या 'आम्ही दिघाटीकर' नामफलकाचे अनावरण मंगळवारी करण्यात आले. या वेळी सरपंच अमित पाटील, उपसरपंच रोहिदास शेडगे, माजी उपसरपंच दत्तात्रेय पाटील, केळवणे पंचायत समिती विभागीय अध्यक्ष हिरामण ठाकूर, ज्येष्ठ नेते चांगाजी पाटील, ग्रामपंचायत सदस्य मनोहर पाटील, कैलास पाटील, ज्येष्ठ नेते बळीराम ठाकूर, प्रमोद पाटील, रामदास ठाकूर, रामभाऊ नामा पाटील, नंदकुमार पाटील, निखील ठाकूर, सागर पाटील, दत्तात्रेय ठाकूर, राजेश ठाकूर व ग्रामविकास परिवर्तन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**



**पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त नगरसेविका दर्शना भोईर यांच्या घरी बुधवारी होम आयोजित करण्यात आला होता. दरम्यान, या वेळी कुमारीका पूजनचाही कार्यक्रम झाला.**

## उरणमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी व्याख्यान

**उरण : प्रतिनिधी**

नवदुर्गा नवरात्रोत्सव मंडळ, बोरी आणि यूईएस स्कूलच्या संयुक्त विद्यमाने ज्युनिअर व सिनीअर कॉलेजच्या विद्यार्थिनींसाठी तारुण्याच्या वाटेवर या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.



कार्यक्रमाची सुरुवात उलवेतील चाईल्ड केअर कन्सल्टंट डॉ. माधवी गोसावी यांच्या भाषणाने झाली. ज्यात त्यांनी विद्यार्थिनींना आपल्या अनुभवाचे बोल सांगितले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. पराग कारोळकर यांनीही तारुण्याच्या वाटेवरच्या महत्त्वाच्या गोष्टी विद्यार्थिनींना उलगडून सांगितल्या.

या वेळी यूईएसचे अध्यक्ष आर्किटेक्ट तनसुख जैन, माजी अध्यक्ष व सदस्य ॲड. राजेंद्र भानुशाली, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या सोनाली म्हात्रे, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या सिमरन दहिया, माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका, सिनिअर कॉलेजच्या एचओडी, तसेच 'राष्ट्रीय सेवा योजना' कार्यक्रम अधिकारी आणि ज्युनिअर व सिनीअर कॉलेजच्या विद्यार्थिनी, शिक्षक, नवदुर्गा नवरात्रोत्सव मंडळ अध्यक्ष अतुल ठाकूर, नंदन पानसरे, संतोष पवार व इतर पदाधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.



**खांदा कॉलनी : आसुडगाव येथे अक्षय हुद्दार यांच्या श्री आर्ट्स या दुकानाचे उद्घाटन भाजप पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, भाजप ओबीसी सेलचे रायगड जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, पं. स. सदस्य भुपेंद्र पाटील, भाजप नेते शशीकांत शेळके आदी उपस्थित होते.**

## जासई हायस्कूलमध्ये वाचन प्रेरणा दिन

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासई विद्यालयात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती व वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष कामगार नेते भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय सरचिटणीस सुरेश पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमास गाव अध्यक्ष यशवंत घरत, सेनादल अध्यक्ष पद्माकर घरत, विद्यालयाचे प्राचार्य संस्थेचे



लाईफ वर्कर अरुण घाग, रयत सेवक संघाचे उपाध्यक्ष नुरा शेख, ज्युनिअर विभाग प्रमुख शिंदे, डी. बी. म्हात्रे आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# आंधळं दळतंय...!

आंधळं दळतंय... अशी एक मासलेवाईक म्हण आपल्या मराठी भाषेत आहे. ती महाविकास आघाडी सरकारच्या कारभाराला अगदी अचूक लागू पडते. मविआ सरकार सत्तेवर येऊन आता दोन वर्षे होतील, परंतु घोटाळे, भ्रष्टाचार, सत्तेचा मस्तवालपणा आणि बजबजपुरीची चर्चा झाली नाही असा एकही दिवस गेला नाही. उद्धवा, अजब तुझे सरकार ही ओळ जणू मविआ सरकारसाठीच लिहिली गेली असावी अशी परिस्थिती आहे.

**महाविकास आघाडी सरकारातील वीजमंत्र्यांवर त्यांच्याच पक्षाचे नेते भ्रष्टाचाराचे आरोप करतात. एका युवतीच्या गूढ मृत्यूप्रकरणी वनमंत्र्याला घरचा रस्ता पकडावा लागतो. परिवहनमंत्र्यांचे रिसॉर्टचे बांधकाम अनेकांच्या भिवया उंचावणारे ठरते. एका ज्येष्ठ मंत्र्याचे जावई गांजाच्या तस्करीत जेलची हवा खाऊन येतात. या सरकारातील माजी गृहमंत्र्यांचा वादाच्या भोवऱ्यात सापडल्यानंतर थांगपत्ता लागत नाही. मुंबईसारख्या महानगराचा पोलीस आयुक्त परदेशात पळून गेल्याची जोरदार चर्चा होते. अशी कितीतरी उदाहरणे सांगता येतील. याच माळेतील आणखी एक कडी गुरुवारी गोवली गेली. गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांना ठाणे पोलिसांनी अटक करून न्यायालयासमोर उभे केले. सायंकाळनंतर त्यांची जामिनावर सुटका झाली. दीड वर्षापूर्वी अनंत करमुसे नावाच्या एका सिव्हिल अभियंत्याला आव्हाड यांच्या राहत्या बंगल्यात नेऊन मारहाण करण्यात आली होती. यात तीन-चार पोलीस देखील सामील होते. याशिवाय आव्हाड यांचे तथाकथित कार्यकर्ते देखील मारहाणीत सामील झाले असे दिसते. विशेष म्हणजे अनंत करमुसे यांना मारहाण झाली तेव्हा राज्याचे गृहनिर्माणमंत्री तेथे उपस्थित होते. हिंदी चित्रपटात उत्तरेतील एखादा बाहुबली ज्याप्रमाणे रयतेतील निरुपद्रवी व्यक्तिरेखेला शिक्षा देतो, तशाच प्रकारचे हे दृश्य माध्यमांनी रंगवले होते. दीड वर्षापूर्वी घडलेल्या या मारहाणीच्या घटनेला अखेर गुरुवारी योग्य ती दिशा मिळाली. करमुसे यांनी आव्हाड यांच्याविरुद्ध फेसबुकवर आक्षेपार्ह पोस्ट टाकली होती. या भयंकर गुन्ह्याबद्दल त्यांना आव्हाड यांच्या गुंडांनी शिक्षा दिली. ठाणे पोलिसांकडून योग्य ती कारवाई केली जात नसल्याची तक्रार करमुसे यांनी आपल्या वकिलामार्फत माननीय उच्च न्यायालयात गुदरली होती. याची दखल घेत न्यायालयाने आदेश जारी केले. तेव्हा कुठे पोलिसांनी माननीय गृहनिर्माण मंत्र्यांना अटक करण्याचा उपचार पार पाडला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आव्हाड यांना अटक होऊन न्यायालयासमोर उभे केल्याची बातमी कुठल्याही टीव्ही वाहिनीवर कुणी पाहिली नाही. त्यांना जामीन मिळून ते घरी पोहोचल्यानंतरच बातमी फुटली. भारतीय जनता पक्षाचे नेते किरीट सोमय्या यांनी यासंदर्भात ट्वीट करून माहिती दिल्यानंतरच आव्हाड यांच्या अटकेची बातमी जगाला कळली. एवढी गुपचूप कारवाई कशाकरिता हा खरा प्रश्न आहे. एरव्ही संशयित आरोपीवर होणाऱ्या कारवाया दाखवताना टीव्ही वाहिन्यांच्या कॅमेऱ्यांची नुसती चढाओढ लागते. महाविकास आघाडीतील एक महत्त्वाचा नेता आणि मंत्री असलेल्या व्यक्तीला अटक होते ही बातमी मात्र अंशत: दडवली जाते हे अनाकलनीय आहे. अनंत करमुसे यांना झालेल्या मारहाणीचा खटला न्यायालयात चालेल आणि त्याचा योग्य तो फैसला देखील होईल. महाविकास आघाडी सरकारमधील वादग्रस्त प्रकरणांच्या लांबलेल्या यादीत आणखी एका प्रकरणाची भर पडली, एवढे मात्र या घटनेमुळे सिद्ध झाले. एवढे होऊन देखील मविआ सरकारमधील नेते निगरगट्टपणे खुर्चीला घट्ट चिकटून बसले आहेत, याला काय म्हणायचे?**

# जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी खुला

**खबरबात**
**संजय करडे**

ऐतिहासिक जंजिरा किल्ला दर वर्षी १ सप्टेंबरपासून पर्यटकांसाठी खुला करण्यात येतो, मात्र कोविडचा प्रादुर्भाव वाढल्याने हा किल्ला गेल्या अनेक महिन्यांपासून बंद होता. त्यामुळे पर्यटक नाराज होते. त्यांना या किल्ल्याचे दुरूनच दर्शन घ्यावे लागत होते. कोरोनाविषयक नियमांचे पालन करून रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक स्मारके व स्थळे खुली करण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार प्रसिद्ध जंजिरा किल्लाही पर्यटकांसाठी खुला झाला आहे. रविवारपासून पर्यटक किल्ल्यात जाऊ लागले आहेत.



रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी परवानगी देताच पुरातत्त्व खात्याने जंजिरा किल्ल्यातील अंतर्गत साफसफाईस सुरुवात केली. पावसामुळे किल्ल्याच्या आतील भागात



गवत, झाडे झुडपे वाढली होती. त्याचा पर्यटकांना त्रास होऊ नये, यासाठी पुरातत्त्व खात्याकडून ही साफसफाई करण्यात आली आहे. जल वाहतूक सोसायट्यांनी सदरचा किल्ला लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. आता हा जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी खुला करण्यात आला आहे. पहिल्याच दिवशी जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांनी गर्दी केली होती. हळूहळू ही गर्दी मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.


जंजिरा किल्ला पाहण्यासाठी दरवर्षी सुमारे पाच लाख पर्यटक येत असतात, परंतु मागील काही महिन्यांपासून हा किल्ला बंद असल्याने स्थानिकांच्या रोजगाराचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. किल्ला बंद असल्याने पर्यटक येथे वस्ती करणे टाळत होते, तसेच किल्ल्याच्या अवतीभवती असणारे शहाळे विक्रेते, गॉगल्स, टोप्या, टी-स्टॉल, सरबत विक्रेते, आयस्क्रीम विक्रेते अशा अनेक लोकांचा व्यवसाय बंद पडला होता. त्याचप्रमाणे शिडांच्या १३ आणि दोन यांत्रिक बोटी बंद झाल्याने सुमारे २५० लोकांचा रोजगार बुडाला होता. पर्यटक थांबत नसल्याने हॉटेल व लॉजिंग व्यवसायसुद्धा अडचणीत आले होते. कोरोनाच्या विविध नियमावलीमुळे सदरचे व्यवसाय डबघाईस आले होते. जंजिरा किल्ला लवकरात लवकर सुरू करण्यात यावा, अशी मुरूडमधील हॉटेल व लॉजिंग व्यवसायिकांचीसुद्धा मागणी होती. आता किल्ला पर्यटकांसाठी खुला झाल्याने सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

२२ एकराचा परिसर आणि २२ बुरुज असलेला हा महाकाय जंजिरा किल्ला पर्यटकांना आकर्षण ठरला आहे. चारही बाजूला समुद्र असतानादेखील या किल्ल्यात दोन गोड्या पाण्याचे तलाव आहेत. कलालबांगडी यासारखी मोठी तोफ आहे. हा महाकाय किल्ला पाहण्यासाठी महाराष्ट्र, तसेच परदेशी नागरिकांची येथे नेहमीच गर्दी पाहावयास मिळते.

समुद्रातील जंजिरा किल्ल्यात पर्यटकांची ने-आण करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाने जंजिरा पर्यटक सोसायटी या संस्थेला परवाना दिला आहे. या संस्थेच्या १३ शिडांच्या बोटी असून, त्यामधून पर्यटक वाहतूक केली जाते. खोरा बंदरातूनसुद्धा किल्ल्यात पर्यटकांची ने-आण केली जाते. दिघी बंदरातूनही पर्यटक जंजिरा किल्ल्यावर येतात. महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाचे राजपुरी येथील बंदर निरीक्षक यशोधन कुलकर्णी यांनी सांगितले की, ऐतिहासिक जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी खुला झाला असून सलग सुट्ट्या असल्यास किल्ल्यावर मोठी गर्दी होत आहे. शासनाची कोरोनाविषयक नियमावलीचे तंतोतंत पालन करून पर्यटकांची वाहतूक करण्याच्या सूचना जलवाहतूक सोसायट्यांना दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी बंदी असल्याने पर्यटक येथे थांबत नव्हते. त्यामुळे हॉटेल व लॉजिंग व्यवसाय अडचणीत सापडले होते. त्यामुळे जंजिरा किल्ला सुरू व्हावा, अशी हॉटेल व लॉजिंग व्यवसायिकांची मागणी होती, असे बांबू हाऊसचे मालक प्रयाग केंडू यांनी सांगितले.

प्रदीर्घ कालावधीनंतर जंजिरा किल्ला सुरू झाल्याने मुरूडमध्ये पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पर्यटक वस्ती करू लागल्याने लॉजिंग व हॉटेल व्यवसाय उत्तमरीत्या होत असल्याबद्दल प्रयाग केंडू यांनी समाधान व्यक्त केले.



# पाणोसे शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील पाणोसे येथील प्राथमिक शाळेतील ३० विद्यार्थ्यांना वनमाळी शेठ व विनायक इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन यांच्यातर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. पाणोसे ग्रामस्थ सदानंद मोरे यांच्याकडून गुणवंत विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे देण्यात आली. तर पांडुरंग तांबे यांनी शाळेला ट्यूबलाईट भेट दिली.

अविष्कार फाउंडेशनचे जिल्हा कार्याध्यक्ष शंकर शिंदे आणि जिल्हा संघटक भालचंद्र खाडे यांच्या हस्ते मंगळवारी पाणोसे शाळेतील ३० विद्यार्थ्यांना दप्तरे, कंपास पेटी, पेन, चित्रकला वही, कलरपेटी, रजिस्टर आणि वह्या आदी शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले.

पाणोसे गावाचे अध्यक्ष बळीराम तांबे, शाळेच्या मुख्याध्यापिका उर्मिला शंकर शिंदे, शिक्षक संजीवन खैरे, देवराम खेमणार, विवेकानंद गोडबोले, स्वदेश फाउंडेशचे सनी जाधव, दत्ता मुंढे, साळवे ग्रामपंचायत सदस्य भिकू शिर्के, मुंबई मंडळाचे सदस्य पांडुरंग तांबे, संतोष तांबे, ग्रामस्थ सदानंद महाडिक, प्रदीप शिर्के या वेळी उपस्थित होते.



# इंदापूर येथील शिबिरात ४० जणांचे रक्तदान

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील इंदापूर येथील जय हनुमान नवरात्रोत्सव मंडळाने मंगळवारी (दि. १२) श्री हनुमान मंदिरात रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात ४० जणांनी रक्तदान केले.

इंदापूर (ता. माणगाव) उपसरपंच उदय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेले हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी जय हनुमान नवरात्रोत्सव मंडळ, जय हनुमान ग्रामविकास मंडळ आणि ओम साई मित्र मंडळ या संस्थांच्या कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.



# कर्जत कळंब येथे तरुणाची आत्महत्या

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील कळंब ग्रामपंचायत हद्दीतील चाहुचीवाडी येथील विहिरीमध्ये मंगळवारी (दि. १२) संध्याकाळी एका तरुणाने आत्महत्या केली. दशरथ रघुनाथ बनसोडे (वय २२, मुळ रा. पाटगाव, ता. मुरबाड) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे.

सुरक्षा रक्षक म्हणून काम करणारा दशरथ बनसोडे मंगळवारी सायंकाळी चाहुचीवाडी येथील विहिरीजवळ आला. आजूबाजूला कोणी नाही याची खात्री करून त्याने विहिरीत उडी मारून आत्महत्या केली. बुधवारी सकाळी काही आदिवासी पाणी आणण्यासाठी आले असता त्यांना विहिरीत मृतदेह तरंगत असल्याचे दिसले. त्याची माहिती त्यांनी कळंब पोलिसांना दिली. पोलिसांनी स्थानिक आदिवासी तरुणांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढला. या प्रकरणाची नोंद नेरळ पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# माणगावात टपाल कर्मचाऱ्याची आत्महत्या

**माणगाव :** रायगडात डाक सप्ताह साजरा होत असतानाच एका ३२ वर्षीय टपाल कर्मचाऱ्याने बुधवारी (दि. १३) सकाळी आपल्या माणगाव येथील घरातील पंख्याला बेडशीट बांधून गळफास घेतला. तुकाराम निवृत्ती भडके (वय ३४, मूळ रा. चोतेवाडी, जि. बीड, सध्या रा. सिद्धीनगर, माणगाव) हे गोरेगाव येथील पोष्टात कार्यरत होते. बुधवारी सकाळी त्यांनी बेडरूमधील छताच्या पंख्याला बेडशीट बांधून गळफास घेतला. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी करण्यात आली आहे. अधिक तपास महिला पोलीस नाईक के. डी. जाधव करीत आहेत.



(छाया : सलीम शेख)

# माणगाव शिरवली येथे पोषण आहार जोगवा

**माणगाव : प्रतिनिधी**

नवदुर्गा महोत्सव अंतर्गत माणगाव तालुक्यातील शिरवलीसाजे आदिवासीवाडी येथे जोगवा कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात पोषण आहाराविषयी माहिती व जागृती करण्यात आली. या वेळी विविध चित्रकृतीतून व देखाव्यातून पोषण आहारासंबंधी माहिती देण्यात आली.

बालविकास प्रकल्प अधिकारी प्रफ्फुल बागल यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षिका सीमा ठाकरे यांनी शिरवलीसाजे आदिवासीवाडीत जोगवा कार्यक्रम आयोजित केला होता. या वेळी कुपोषणामुळे होणारे विविध आजार आणि पौष्टिक आहाराचे महत्त्व सांगण्यात आले. अंगणवाडी सेविका विजयश्री सावंत, मदतनीस मानसी काटकर यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. शिरवली आदिवासीवाडीतील ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

# रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराज

**रोहा शहराच्या पश्चिमेला ग्रामदैवत श्री धावीर महाराज यांचे स्थान आहे. सर्वधर्मिय समाजबांधव भक्तिभावाने श्री धावीर महाराजांची सेवा करतात. श्री धावीर महाराजांच्या पालखी उत्सवाला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक येतात.**



रोहे येथील बळवंतराव विठोजी मोरे यांचा वराठी येथील धावीर महाराजांच्या दर्शनाला जाण्याचा नित्यनेम होता. वृद्धापकाळात त्यांना डोंगर चढून वराठीला जाणे अशक्य होऊ लागले. मात्र त्यांची श्रद्धा पाहुन धावीर महाराजांनी त्यांना दृष्टांत दिला की, रोहे शहराच्या पश्चिम भागामध्ये वराठीमध्ये नजर पोहोचेल असा कातळ आहे. त्या जागेवर माझे दर्शन घ्यावे. हा दृष्टांत होताच बळवंतराव मोरे यांनी त्या ठिकाणी त्यांच्या पाच भावांच्या सहाय्याने १७६९ साली मंदिर बांधले. १८४९ साली या देवळामध्ये आज असलेल्या मूर्तीची स्थापना केली. हे देऊळ पूर्णपणे लाकडापासून बांधले असल्यामुळे ते कालांतराने जीर्ण झाले. त्यानंतर ग्रामस्थांनी वर्गणीतून मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचे ठरविले. स्वाध्यायी प्रणेते प. पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या हस्ते १४ मार्च १९९४ रोजी जीर्णोद्धाराचे काम सुरू झाले. या मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ धावीर महाराजांचा रक्षक चेडा याचे स्थान आहे. गाभाऱ्यामध्ये धावीर महाराजांच्या डाव्या बाजूस देवी काळकाई, उजव्या बाजूस धाकसूत महाराज पाठीमागे वीर व कोपऱ्यामध्ये वाघ बाप्पा अशी देवांची स्थाने आहेत.

या देवस्थानात दरवर्षी नवरात्रोत्सव उत्साहात साजरा केला जातो. या काळात दररोज कीर्तन, गोंधळ, भजन आदी कार्यक्रम होतात. दसऱ्याच्या दिवशी सकाळी धावीर महाराजांची पालखी काढली जाते. नवरात्रीमध्ये नित्यनेमाने श्री धाविर महाराजांच्या दर्शनला येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे.

**-महादेव सरसंबे**



## सशस्त्र पोलिसांची मानवंदना

*सशस्त्र पोलिसांची मानवंदना हे या देवस्थानाचे वैशिष्ट्य आहे. सशस्त्र पोलीस मानवंदना मिळणारे श्री धावीर महाराज हे महारष्ट्रतील एकमेव ग्रामदैवत आहे. ब्रिटिशकाळापासून या देवस्थानास पोलिसांकडून मानवंदना देण्यात येते. रायगड पोलीस दलाकडून रोह्याचे पोलीस निरीक्षक श्री धावीर महाराजांना सशस्त्र सलामी देतात. ही मानवंदना स्वीकारल्यानंतर देवळामधून निघालेली श्री धावीर महाराजांची पालखी संपूर्ण गावातून फिरते. हिंदू, मुस्लिम, बौद्ध, जैन समाजबांधव या पालखीचे मोठ्या भक्तिभावाने स्वागत करून राष्ट्रीय एकात्मतेचे स्वरूप दाखवून देतात. धावीर महाराजांच्या पालखीच्या दिवशी सांयकाळी धावीरचे वारे कुलकर्णी यांच्या वंशजाच्या अंगात खेळते. ते वारे पाहण्यास भाविकांची तुफान गर्दी लोटते.*



# पावसामुळे भातापिकाचे नुकसान


## कर्जत तालुक्यातील शेतकरी हतबल

**कर्जत : बातमीदार**

परतीच्या पावसाने कर्जत तालुक्यातील भातपिकाचे मोठे नुकसान केले आहे. शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने नुकसानग्रस्त शेतीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत.

कर्जत तालुक्यातील ८९६४ हेक्टर जमिनीवर या वर्षी भाताची शेती केली आहे. पावसाचे प्रमाण लक्षात घेऊन शेतकरी भाताचे बियाणे निवडत असतात. सुमारे १२० दिवसात म्हणजे तीन महिन्यांत तयार होणारे वाण कर्जतमधील शेतकरी बियाणे म्हणून वापरत असतात. या वर्षी मोसमी पाऊस वेळेवर सुरू झाला, त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांनी पेरणी केली. ते पीक सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस तयार झाले. पण हस्त नक्षत्र संपूनदेखील परतीचा पाऊस थांबण्याचे नाव घेताना दिसत नाही. त्यात परतीच्या पावसासोबत येत असलेला वारा हा देखील भाताचे पिकाची नुकसानी करणारा ठरत आहे. परतीचा पाऊस कर्जत तालुक्यात अजूनही धुमाकूळ घालत असल्याने भाताची तयार रोपे कोसळून शेतातील पाण्यामुळे कुजून जात आहेत.





(छाया : संतोष पेरणे)

भाताचे पीक शेतातच कुजून जात असल्याने कर्जत तालुक्यातील शेतकरी संकटात आले आहेत. नुकसानग्रस्त भाताच्या पिकाची पाहणी करून पंचनामे करावेत, अशी मागणी शेतकरी मंचाचे अध्यक्ष विनय वेखंडे यांनी तहसीलदार आणि तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे केली आहे.

**परतीच्या पावसाने होत्याचे नव्हते केले आहे. उभे असलेले भात पीक आडवे झाले असून, शेतातील पाण्यात भिजून भाताच्या दाण्यांना मोड आले आहे.**

**–शशिकांत मोहिते, प्रगतशील शेतकरी, बोर्ले, ता. कर्जत**

**नुकसानग्रस्त भातपिकाचे पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झाले आहेत. त्यानुसार कृषी, महसूल आणि ग्रामपंचायत विभागाच्या माध्यमातून पंचनामे करण्याचे काम सुरू आहे.**

**–शीतल शेवाळे, तालुका कृषी अधिकारी, कर्जत**

# कृषी विभागाच्या बियाणांत भेसळ

(छाया : विजय मांडे)



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या बियाणात भेसळ आढळून येत आहे. त्यामुळे शेतात वेगवेगळ्या जातीच्या बियाणांचे पीक उगवले असल्याने मोठे नुकसान झाल्याचे येथील प्रगत शेतकरी शशिकांत मोहिते यांनी सांगितले.

### कर्जतमधील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

कर्जत तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर भात पिकाची लागवड करतात. उत्पन्न वाढीसाठी कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना काही अटी शर्तीवर तांबूस रंगाच्या भाताचे बियाणे देण्यात आले होते. शेतकऱ्यांनी या बियाणांची मोठ्या क्षेत्रफळावर लागवड करून पीक पिकवले आहे. हे पीक कापणीला आले असून यात मोठ्या प्रमाणात भेसळ पाहायला मिळत आहे.

कर्जत तालुक्यातील प्रगत शेतकरी शशिकांत मोहिते यांनीही या भात बियाणाची लागवड केली असून या भात पिकात भेसळ आढळून आल्याने या भात पिकापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे नुकसान झाले आहे. या भाताला भावदेखील मिळणार नसल्याचे त्यांनी सांगितले.


तौत्के चक्रीवादळात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. मुसळधार पावसाने शेतीचे मोठे नुकसान केले. त्याच्यातूनही बळीराजा सावरत असताना आता कृषी विभागाकडून कोणतीही पडताळणी न करता शेतकऱ्यांना पेरणीसाठी बियाणे देण्यात येत असल्याने पिकाचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे कोणाच्या भरवशावर भात पिक घ्यावे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला.

**कृषी विभागाकडून पीक लागवडीसाठी आम्हा शेतकऱ्यांना नमुना म्हणून बियाणे देण्यात आले होते. हा तांदूळ आयुर्वेदिक असल्याने मधुमेहासारख्या आजारावर उपयुक्त ठरत आहे, परंतु आता या बियाणात भेसळ असल्याचे समोर आले असल्याने आमचे खूप नुकसान झाले आहे.**

**–शशिकांत मोहिते, प्रगत शेतकरी, कर्जत**

# द्रुतगती महामार्गावर ट्रेलरमधील कॉईल कंटनेरवर कोसळली

(छाया : अरूण नलावडे)



**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

द्रुतगती महामार्गावरून चाललेल्या कॉइल वाहक ट्रेलरने गुरूवारी (दि. १४) रात्री पुढे जात असलेल्या कंटेनरला पाठिमागून जोरात ठोकर दिली. या अपघातात ट्रेलरमधील दोन जागीच ठार झाले असून, कंटेनरमधील दोन जण जखमी झाले. त्यांना खोपोलीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### दोन ठार, दोन जखमी

मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावरून एक ट्रेलर कॉईल घेवून मुंबईला जात होता. बोरघाटातील ढेकू गावच्या हद्दीत ट्रेलरने पुढे असलेल्या कंटेनरला ठोकर दिली. त्यामुळे कॉईल ट्रेलरच्या केबिनवर पडली. त्यात केबीन दबली जावून आतील चालक सुरेशकुमार लक्ष्मणराव गडलिंग (वय ३८, रा. अमरावती) आणि राजकुमार सुधाकर राव (रा. दिल्ली) जागीच ठार झाले. तर कंटेनरमधील पप्पू गुप्ता आणि राजकुमर सिंग (दोघेही रा. उत्तर प्रदेश) जखमी झाले. अपघातानंतर द्रुतगी महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.

आपघाताचे वृत्त समजताच बोरघाट पोलीस व अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी ग्रुपच्या सदस्यांनी घटनास्थळी धाव घेत ट्रेलरमध्ये अडकलेले दोन मृतदेह बाहेर काढून वाहतूक पूर्ववत सुरू केली.

# वडखळ–शिर्की रस्त्याचा मार्ग मोकळा होणार

## केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्याकडून हिरवा कंदील

**पेण : प्रतिनिधी**

मागील अनेक वर्षांपासून प्रलंबीत असलेल्या पेण तालुक्यातील वडखळ–शिर्की रस्त्याचा मार्ग मोकळा झाला असून, या रस्त्याच्या साडेआठ कोटी रुपयांचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात पोहचला आहे. केंद्रीय पंचायतराज मंत्री कपिल पाटील यांनीदेखील या रस्त्यासाठी हिरवा कंदील दाखविल्याने आमदार रविशेठ पाटील यांनी केलेल्या प्रयत्नांना यश मिळणार आहे.




(छाया : अनिस मनियार)

पेण खारेपाट विभागातील जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या वडखळ ते शिर्की रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. त्यामुळे या विभागातील बोरी, शिर्की, शिंगणवट गावातील ग्रामस्थांना, वाहन चालकांना त्रास सहन करावा लागत आहे. या बाबत आमदार रविशेठ पाटील यांनी पंतप्रधान ग्रामसडक योजने अंतर्गत वडखळ ते बोरी, शिर्की व शिर्की चाळ नं.२ या ९.६०० कि.मी. लांबीच्या रस्त्यासाठी आठ कोटी ३४ लाख रुपयांचा प्रस्ताव तयार करण्याची मागणी केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी तसेच केंद्रीय पंचायत राज मंत्री कपिल पाटील यांच्याकडे केली आहे. त्या अनुषंगाने अलिबाग येथील पंतप्रधान ग्रामसडक कार्यालयाने या रस्त्याचा आराखडा तयार केला. तो पंतप्रधान ग्रामसडक कार्यालयाचे कार्यकारी अभियंता (पनवेल) व अधीक्षक अभियंता (मुंबई) यांच्याकडून मंजूर होऊन अंतिम मंजुरीसाठी दिल्ली येथे पाठविण्यात आला आहे. या मंजुरीसाठी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील व कार्यकर्ते प्रयत्न करीत आहेत.

भाजपचे दक्षिण रायगड उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्यासह मसदचे सरपंच बळीराम भोईर, शिर्कीच्या सरपंच तेजस्विनी गणेश पाटील, उपसरपंच प्रवीण पाटील, सदस्य सदाशिव पाटील, शेखर पाटील यांनी गुरुवारी केंद्रीय पंचायतराज मंत्री कपिल पाटील यांची भेट घेतली.वडखळ–शिर्की रस्त्यासाठी पुढील एक महिन्यात निधी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन यावेळी ना. पाटील यांनी या वेळी दिले.

पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत आमदार रविशेठ पाटील यांनी प्रस्तावित केलेल्या पेण विधानसभा मतदार संघातील पाच्छापूर ते दर्यागाव ठाकूरवाडी या तीन किमी लांबीच्या रस्त्याची तसेच भैरव ते दर्यागाव ठाकूरवाडी या साडेचार किमी लांबीच्या रस्त्याची मंजुरी देखील अंतिम टप्प्यात आली आहे.

# नवरात्रोत्सवाची सांगता; दसरा उत्साहात साजरा



**अलिबाग : प्रतिनिधी**

साडेतीन मुहुर्तांपैकी एक म्हणून ओळखला जाणारा विजयादशमी अर्थात दसरा हा सण शुक्रवारी (दि. १५) पारंपारिक पध्दतीने सर्वत्र साजरा झाला. तसेच नऊ दिवस सुरू असलेल्या नवरात्रौत्सवाचीही शुक्रवारी सांगता झाली. कोरोनाच्या सावटामुळे हा उत्सव साध्या पध्दतीने साजरा झाला असला उत्साहात कुठेही कमतरता दिसत नव्हती.

या वर्षी नवरात्रौत्सवात गरबा, दांडिया आणि इतर कार्यक्रम रद्द करण्यात आले होते. काही ठिकाणी तर उत्सवच रद्द करण्यात आले होते. त्यामुळे तरूणाईमध्ये काहीसा निरूत्साह होता. नऊ दिवस मनोभावे पूजाअर्चा केल्यानंतर शुक्रवारी देवींच्या मुर्तीचे समुद्र, नदी, तळ्यात विसर्जन करण्यात आले.

'दसरा सण मोठा, नाही आनंदा तोटा' याची प्रचिती शुक्रवारी बाजारपेठांमध्ये, दुकानांमध्ये झालेली गर्दी आणि मोठ्या प्रमाणात झालेली वाहन खरेदी यातून आली. दसऱ्यानिमित्त घराघरात उत्साहाचे वातावरण होते. घरोघरी पूजाअर्चा, शस्त्रास्त्र पूजन झाले. व्यापाऱ्यांनीही आपल्या दुकानातील वजनमापे व अन्य साहित्याची पूजा केली.

दसऱ्याच्या निमित्ताने शुक्रवारी जिल्ह्यात लाखो रुपयांची उलाढाल झाली. सोन्याच्या भावातील चढ–उतार बघून नागरिकांनी मुहुर्त साधला आणि सोने खरेदी केले. टीव्ही, फ्रीज, मोबाईल, वॉशिंग मशिन या सारख्या नित्योपयोगी वस्तुंचीही खरेदी झाली. अनेक ठिकाणी नवीन दुकानांचे उद्घाटन झाले. बांधकाम क्षेत्रातही नवीन कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

# आंग्रे घराण्याची परंपरा


## विजयादशमीला कान्होजी आंग्रेच्या तलवार, ढालीचे पूजन

अलिबाग : प्रतिनिधी

दसरा म्हणजे विजयादशमीला शस्त्रांची पूजा केली जाते. दर्यासागर सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या घराण्यात आजही विजयादशमीच्या दिवशी शस्त्र पूजन केले जाते. सरखेल कान्होजी आंग्रे यांचे नववे वंशज रघुजीराजे आंग्रे हे आजही शस्त्र पूजन परंपरा जपत आहेत. यानिमित्ताने सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या शस्त्रांचे दर्शनही मिळते.

सरखेल कान्होजी आंग्रे हे दर्याचे राजे होते. समुद्रावर आंग्रे याची सत्ता होती. त्यांनी युद्धात अनेक शस्त्र वापरली. त्यांची तलवार पाच किलो वजनाची असून दमस्कर स्टीलपासून बनवली आहे. तर ढालही वजनी आहे. तलवार, भाले, गुप्ती, बंदूक ही युद्धातील शस्त्रे, कसरत करायचे मुदगल याची पूजा विजयादशमीला केली जात आहे. कान्होजी आंग्रे यांनी वापरलेली शस्त्रे घेरिया या बंगल्यात आकर्षकरित्या ठेवून त्यांची यथासांग पूजा करून रघुजीराजे आंग्रे आजही क्षत्रिय घराण्याची परंपरा जपत आहेत.





# आनंदवाडी येथील लसीकरण शिबिरात आदिवासी लोकांचा सहभाग

**कर्जत : बातमीदार**

मंगेश म्हसकर मित्र मंडळ आणि नेरळ ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यामाने ग्रामपंचायत हद्दीमधील आनंदवाडीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात सुमारे २०० आदिवासी बांधवांनी लसीकरण करून घेतले.



नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या माध्यमातून आनंदवाडी प्राथमिक शाळेत लसीकरण शिबिर घेण्यात आले. या वेळी आदिवासी लोकांचे प्रबोधन करून आणि लसीकरणाचे महत्त्व सांगितल्यानंतर १५० आदिवासी बांधवांनी कोविशिल्ड लसीचा पहिला डोस तर ५० आदिवासींनी दुसरा डोस घेतला. नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राचे सुभाष चव्हाण, धनश्री जगताप, नारायण शिंगवा, संतोष दरवडा यांनी लसीकरण करून घेतले.

नेरळच्या सरपंच उषा पारधी, भाजपचे कर्जत तालुका अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य मंगेश म्हसकर तसेच प्रकाश पेमारे, सदानंद शिंगवा, नरेंद्र कराळे, धनंजय धुळे, मयुरी जामघरे, भाविका क्षीरसागर आणि आनंदवाडी शाळेचे शिक्षक रवींद्र सोनावणे, माने, झुगरे आदी उपस्थित होते.

# खालापूर कारागृहात वाचनालयाचा शुभारंभ

## सहजसेवा फाउंडेशनचा नवीन उपक्रम



**खालापूर : प्रतिनिधी**

सहजसेवा फाउंडेशनच्या खालापूर कारागृहातील वाचनालयाचा दसऱ्याच्या मुहूर्तावर शुक्रवारी (दि. १५) तहसीलदार आयुब तांबोळी व पोलीस निरीक्षक अनिल विभूते यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. येथील चांगल्या प्रकारची पुस्तके वाचून कैद्यांचे मत व मन परिवर्तन होईल, असा विश्वास तहसीलदार तांबोळी यांनी या वेळी व्यक्त केला.

नायब तहसीलदार कल्याणी कदम, खोपोली नगर परिषदेचे गटनेते सुनील पाटील, खालापूरच्या माजी नगराध्यक्षा शिवानी जंगम, केटीएसपीचे चेअरमन संतोष जंगम, एकनाथ पिंगळे, संदीप पाटील, सह्याद्री विद्यालयाचे अध्यक्ष नरेंद्र शाह, खालापूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शेखर लव्हे, गणेश कराड, उपनिरीक्षक बजरंग राजपूत, राजेश पाटील, राजेंद्र फक्के, डॉ.हेमा चिंबुळकर, दशरथ देशमुख,गणेश पाटील, दिनेश पाटील, विकी भालेराव, जनार्दन कदम या वेळी उपस्थित होते.

सहजसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, कार्याध्यक्षा माधुरी गुजराथी, उपाध्यक्षा इशिका शेलार, सचिव वर्षा मोरे, खजिनदार, संतोष गायकर, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुळकर्णी, कार्यवाह बी. निरंजन, उपक्रम प्रमुख प्रथमेश पाटील, बंटी कांबळे, आफताब सय्यद, योगिता जांभळे, अखिलेश पाटील, नकुल देशमुख, आयुब खान, आसमा पटेल, विशाल शिर्के, आसिफ खान, सुरेश खोपडे यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.








दसरा गणेशोत्सवानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वहाळ, बामणडोंगरी, उलवे या परिसरांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या उत्सवांना भेट देत गणपती बाप्पाचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, आर. के. पाटील, वहाळ ग्रामपंचयातीचे उपसरपंच अमर म्हात्रे, सदस्य चेतन घरत, वसंत म्हात्रे, जनार्दन म्हात्रे, गणेश पाटील, शैलेश चिर्लेकर, संदीप दापोलकर, संतोष ठाकूर, उदय ठोकळ, सुजित घरत आदी उपस्थित होते.



उरण : भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष निळकंठ घरत यांच्या चिर्ले येथील निवासस्थानी दसऱ्यानिमित्त विराजमान गणपतीचे आमदार महेश बालदी यांनी दर्शन घेतले. या वेळी भाजप उरण शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, अल्पसंख्याक जिल्हा अध्यक्ष जसिम गॅस, कामगार आघाडी जिल्हा अध्यक्ष जितेंद्र घरत, चिर्ले साईकृपा मंडळ अध्यक्ष संतोष भगत, रवींद्र घरत, कमलाकर घरत, संजय घरत, चंदन घरत, शिवदास घरत, विलास माळी, महेंद्र म्हात्रे, चेतन कडू, अरविंद घरत आदी उपस्थित होते.

















पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी विविध ठिकाणी सदिच्छा भेट देऊन देवींचे दर्शन घेतले. या वेळी त्यांचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले.



पनवेल : भाजपचे रायगड जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, भुपेंद्र पाटील, शशिकांत शेळके, अक्षय खुद्दार आदी उपस्थित होते.




पनवेल : ओवळे येथील साई संस्थानला भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी न्हावे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, भाजप उलवे नोड चिटणीस मोरेश्वर पाटील, साई मंडळाचे अध्यक्ष सुनील म्हात्रे, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, चंद्रकांत भोईर, दर्शन ठाकूर, चंद्रकांत पाटील, प्रल्हाद म्हात्रे, राम म्हात्रे आदी उपस्थित होते.



पनवेल : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने नवरात्रोत्सवादरम्यान दुर्गामाता दौड दसऱ्याच्या दिवशी शिवाजी चौक येथून सुरू करण्यात आली. ही दौड पनवेलमध्ये फेरी मारून पुन्हा शिवाजी चौक येथे समाप्त करण्यात आली. गावातील व शहरातील लोकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.



द्रोणागिरी बाजार महिला कर्मचारी, उरण, नवी मुंबई



पनवेल : हरियाणा येथे १८ सप्टेंबर रोजी पार पडलेल्या राष्ट्रीय स्तरावरील ४८ किलो वजनी गटातील कुस्ती स्पर्धेत पळस्पे गावची सुकन्या विनीता प्रमोद गवंडी हिने सुवर्णपदक पटकाविले. त्याबद्दल गवंडी, चोरघे परिवाराकडून तिचे अभिनंदन करण्यात आले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. —मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com